ePaper
‘उबाठा’ गट चायनीज छत्रीसारखा, कोणतीही गॅरंटी नाही: एकनाथ शिंदे



‖ वर्ष - 7 । अंक - 349 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 20 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- अमेरिका जिंकता जिंकता हरली!
- जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष
- सरकारची शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा!
- ऑर्किड शेतीचा यशस्वी प्रयोग..!

## ‘एनडीएमध्ये पुन्हा कधीच जाणार नाही’: उद्धव ठाकरे

# ‘तुम्हीच खरे माओवादी’!

### उद्धव ठाकरेंची नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीका

।मुंबई ।महाईन्यूज

**‘आमच्यावर शिंदे गटाकडून शहरी माओवादाचा आरोप केला जात आहे. मात्र, तुम्ही तर तपासयंत्रणा, सरकारी यंत्रणांचा गैरवापर करीत असून, सत्तेचा दुरुपयोग करणे हे शहरी माओवादापेक्षा भयानक आहे. त्यामुळे तुम्हीच खरे माओवादी आहात’, असे प्रत्युत्तर शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बुधवारी लक्ष्य केले. लोकशाही, संविधान वाचविणे जर आतंकवाद असेल, तर मी आतंकवादी आहे, असेही ठाकरे म्हणाले.**



शिवसेनेचा (उबाठा) ५८ वा वर्धापनदिन मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात साजरा करण्यात आला. या वेळी ठाकरे गटाने निवडून आलेल्या सर्व खासदारांचा उद्धव ठाकरे यांनी सत्कार केला, तसेच लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या सर्व उमेदवारांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. या वेळी उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत ज्यांनी ज्यांनी मतदान केलं, त्या सगळ्या जाती-धर्माच्या देशभक्तांना मी धन्यवाद देतो आहे, असे सांगत हिंदू, मुस्लिम, शीख ख्रिश्चन अशा सर्वधर्मीयांचा उल्लेख केला. काही संस्थांनी लोकशाही वाचवण्यासाठी इंडिया आघाडीला पाठिंबा दिला. काही यूट्युबरनेही आमचा प्रचार केला. त्यावर मिंधे गटाने हा शहरी नक्षलवाद असल्याचा आमच्यावर आरोप केला. हुकूमशाही, तोडाफोडा आणि लोकशाही वाचवा हा प्रचार नक्षलवाद वाटतो? लोकशाही वाचवणे, संविधान वाचवणे हा जर आतंकवाद असेल तर मी आतंकवादी आहे. मात्र, मोदी, शहा तर सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करीत आहे. कार्यकर्त्यांच्या घरी ईडी सीबीआयला पाठवतात. दमदाट्या देऊन तुरुंगात टाकता, दहशत निर्माण करता हा तुमचा नक्षलवाद नाही का? सत्तेचा दुरुपयोग करणे हा शहरी नक्षलवादापेक्षा भयानक आहे. लोकशाहीची हत्या करण्यासारखे आहे. तुम्ही खरे नक्षलवादी आहात, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

ते म्हणाले, की, मिंद्यांना आणि भाजपला आव्हान देतो, की षंढ नसाल तर शिवसेनाप्रमुखांचा फोटो न लावता, धनुष्यबाण न लावता, शिवसेनेचे नाव न लावता लढून दाखवा. नाही तर षंढ म्हणून गावात फिरू नका. आम्ही शिवसेनाप्रमुखांखेरीज कुणाचाही फोटो वापरला नाही. कुणाचाही वापरणार नाही. मोदींचा तर वापरणारच नाही. माझ्या वडिलांचा फोटो लावून तुम्ही मला कसला स्ट्राइक रेट सांगता, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रात पाच टप्प्यांत निवडणूक झाली. तुम्ही पाच काय तर दहा टप्प्यांतही निवडणूक घेतली असती तर आम्ही रोज तुमची सालटी काढली असती. मी नम्र आहे; पण जर कोणी पाठीत वार करणार असेल तर आम्ही वाघनखे काढणार, असेही ते म्हणाले. भाजपला तडाखा बसल्यानंतर आता ते विषयांतर करीत आहेत. मी पुन्हा एनडीएमध्ये जाणार, असे सांगत आहेत. आपल्याला मातेप्रमाणे असलेल्या शिवसेनेला संपवायला निघालेल्यांसोबत मी कधीच जाणार नाही, असे सांगत हे तुम्हाला तरी मान्य आहे का, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी विचारताच गर्दीतून नाही नाही असे उत्तर आले. हे सरकार आपण पाडले पाहिजे, मध्यावधी निवडणूका लागणार असून, त्यानंतर आपण सत्तेवर येणार आहोत, असेही ते म्हणाले.

### धनुष्यबाणाचा वापर न करता लढण्याचे शिंदेंना आव्हान

‘आमच्यावर शिंदे गटाकडून शहरी माओवादाचा आरोप केला जात आहे. मात्र, तुम्ही तपास यंत्रणा, सरकारी यंत्रणांचा गैरवापर करीत असून, सत्तेचा दुरुपयोग करणे हे शहरी माओवादापेक्षा भयानक आहे. त्यामुळे तुम्हीच खरे माओवादी आहात,’ अशा शब्दांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बुधवारी लक्ष्य केले. लोकशाही, संविधान वाचविणे दहशतवाद असेल, तर मी दहशतवादवादी आहे, असेही ठाकरे म्हणाले.

### राज ठाकरे, फडणवीसांवर टीका

उद्धव ठाकरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले, ‘या निवडणुकीत आपले कोण आणि परके कोण दिसले. काही लोकांनी तर उद्धव ठाकरे नको म्हणून ‘बिनशर्ट’ पाठिंबा दिला. उघड पाठिंबा म्हणजेच ‘बिनशर्ट’ पाठिंबा असतो.’

### उद्धव ठाकरे म्हणाले

- भाजपला तडाखा बसल्यानंतर आता ते विषयांतर करीत आहेत. मी पुन्हा एनडीएमध्ये जाणार, असे सांगत आहेत. आपल्याला मातेप्रमाणे असलेल्या शिवसेनेला संपवायला निघालेल्यांसोबत मी कधीच जाणार नाही.
- भाजपचे २०१४ आणि २०१९ मधील निवडणुकांमधील फोटो पाहा. त्या वेळी त्यांच्यासोबत चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार नव्हते. मात्र, आता त्यांच्यासोबत भाजपने अनैसर्गिक युती केली आहे. हे कसले हिंदुत्ववादी आहेत?
- आम्ही काय आहोत ते या मुस्लिम समजाला माहिती आहे. आम्ही पाठीत वार करणारे नव्हे, तर समोरून वार करणारे आहोत. आपण भाजप; तसेच मोदी अजिंक्य नाहीत, हे जगाला दाखवले आहे. मोदींचे पाय मातीचेच आहेत हेसुद्धा दाखवले आहे. आता हार-जीत होत असतेच; पण मी हिंमत हरणार नाही आणि तुम्हालाही हिंमत हारू देणार नाही. काही ठिकाणी आपला झालेला पराभव माझ्या जिव्हारी लागलाय आणि त्याचा वचपा मी घेतल्याशिवाय राहणार नाही.

# जुन्या मुंबई पुणे महामार्गावर

# कंटेनरला भीषण अपघात!

## स्कूल बसला वाचवण्याच्या नादात कंटेनर थेट दुकानात घुसला, महिलेचा जागीत मृत्यू

।वडगांव मावळः
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुन्या मुंबई पुणे महामार्गावर कंटेनरचा विचित्रपणे अपघात झाला आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेला जात असलेला कंटेनर स्कूल बसला वाचवण्याच्या नादात थेट सर्व्हिस रस्त्यावरील असणाऱ्या दुकानात शिरला. ज्यामध्ये एक महिला चिरडली गेली आहे.**



जुन्या मुंबई पुणे महामार्गावर वडगांव चौकात मालवाहू कंटेनरचा विचित्रपणे अपघात झाला आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेला जात असलेला कंटेनर स्कूल बसला वाचवण्याच्या नादात थेट सर्व्हिस रस्त्यावरील असणाऱ्या दुकानात शिरला. या अपघातात एक महिला जागीच ठार झाली असून कंटेनर चालकसह पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. सुदैवाने शाळेच्या बसमध्ये विद्यार्थी नसल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. लता रणजीत जाधव, वय ४१, वडगाव असं अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. तर सृष्टी राजेंद्र भाटेकर, वय १५ रा. केशवनगर, वडगाव, मृदुल संतोष भवार वय १४, मैत्रिय संतोष भवार वय ११ व संदीप पिरणसिंह झालटे, वय ४० तिघेही रा.दिग्विजय कॉलनी, वडगाव हे गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडगाव मावळ येथील एका हॉस्पिटल येथील स्टॉपवर अनेक पालक मुलांना स्कूल बसमध्ये सोडवण्यासाठी आले होते. त्यावेळी स्कुलबसने भर रस्त्यात अचानक ब्रेक मारत थांबा घेतला. त्यामुळे पाठीमागून येत असलेल्या कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटले आणि स्कूल बसला वाचवण्याच्या नादात आक्रीत घडलं. तो कंटेनर थेट सर्व्हिस रोडवर असलेल्या दुकानात शिरला. यावेळी रस्त्यावर उभी असलेल्या महिलेला या कंटेनरने चिरडले.

### वाहतूक विस्कळीत



हा अपघात इतका भीषण होता की यात ती महिला जागीच ठार झाली आहे आणि तेथे उपस्थित इतर पाच जणांना देखील फटका बसला आहे. कंटेनरने बसला देखील ठोकर मारली, पण यात बसची हानी टळली आहे. सदर अपघातामुळे जुन्या मुंबई- पुणे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनास्थळी वडगांव मावळ पोलीसांनी धाव घेऊन घटनेचा पंचनामा करत वाहतूक सुरळीत केली आहे.

---

# आळंदी रोडवरील साई मंदिर येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटला!

## लक्ष्मीनारायण सोसायटीसह परिसरातील नागरिकांना दिलासा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वेगाने विकसित होणाऱ्या चऱ्होली येथील लक्ष्मीनारायण सोसायटी परिसराची आता 'वाहतूक कोंडीमुक्त' होणार आहे. श्री. साई मंदिर आणि परिसरातील वाहतूक नियंत्रण आणि उपाययोजना याबाबत महापालिका, वाहतूक पोलीस, आरटीओ आणि मंदिर व्यवस्थापनाने एकत्रित पुढाकार घेतला आहे. त्यामुळे पुणे-आळंदी रस्त्यावरील साई मंदिर येथे होणाऱ्या ट्रॅफिक समस्येवरती उपाय आणि लक्ष्मीनारायण सोसायटीतील व परिसरातील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.**





आळंदी रोडवरील लक्ष्मीनारायण सोसायटी व परिसरात सुमारे १० हजाराहून अधिक लोकवस्ती आहे. श्रीक्षेत्र आळंदी, औद्योगिक पट्टा चाकण, पुणे व पिंपरी-चिंचवडच्या दिशेने ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या याठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे. तसेच, साई मंदिर असल्यामुळे चौकातील सेवा रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना नियमितपणे करावा लागत होता.

या पार्श्वभूमीर भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महापालिका, वाहतूक पोलीस, आरटीओ आणि मंदिर व्यवस्थानाचे प्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. त्यामुळे सविस्तर चर्चा करुन वाहतूक नियंत्रण आणि सक्षमीकरण याबाबत तोडगा काढण्यात आला.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पुणे- आळंदी रोडवरील साई मंदिर परिसरातील सर्व्हिस रोडवर मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. सर्व्हीस रोड अरुंद असल्यामुळे भाविक मुख्य रस्त्यावरच शेकडो दुचाकी आणि चारचाकी वाहणे पार्किंग करीत असतात. त्यामुळे मंदिराच्या मागील बाजून लक्ष्मीनारायण नगर येथे हजारो नागरिक वास्तव्यास आहेत. त्यांना वसाहतीमध्ये जाण्याकरिता सर्व्हिस रोडचा वापर करावा लागतो. भाविकांनी दुचाकी आणि चारचाकी रस्त्यावरच पार्क केल्यामुळे विरोधी दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी नियमितपणे होत आहे. वाहतूक कोंडीबाबत स्थानिक नागरिकांच्या तक्रारी होत्या. त्यावर तोडगा काढण्यासाठी सदर बैठक घेण्यात आली.

पोलीस निरीक्षक सतीश नांदूरकर म्हणाले की, वाहतूक कोंडी किंवा साई मंदिर व्यवस्थापनाला पत्र दिले आहे. मंदिराच्या आवारातील सर्व्हीस रस्त्यावर वाहनांचे पार्किंग पूर्णत: बंद केले आहे. त्यासाठी मंदिर व्यवस्थापनाकडून ३ सुरक्षारक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच, वाहतूक पोलीस कर्मचारी सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी अशा तीनवेळी या ठिकाणी 'राउंड' करणार असून, पार्किंग पूर्णत: बंद केल्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही.



**"लक्ष्मीनारायण चौक- साई मंदिर येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक विभाग, आरटीओ विभाग आणि महापालिका संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये कायमस्वरुपी तोडगा काढण्याबाबत सूचना केली होती. मंदिर व्यवस्थापनाने कायमस्वरुपी वार्डनची संख्या वाढवण्याची सूचना केली. परिसरातील सर्वसामान्य नागरिकांनी वाहतूक नियंत्रणाबाबत तक्रारी केल्या होत्या. काल मिटिंग झाली आणि आज कार्यवाही सुरू केली आहे. "वाहतूक कोंडीमुक्त भोसरी विधानसभा" अशी मोहीम आम्ही सुरू केली असून, नागरिकांनी परिवर्तन हेल्पलाईन : 93 79 90 90 90 वर सूचना आणि रिपोर्ट करावा, असे आवाहन केले आहे. -महेश लांडगे,**
**आमदार,** भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## अनधिकृत शाळांचा फलक दिसेना दर्शनी

# अनधिकृत शाळा बिनदिक्कतपणे सुरू!

### पीसीएमसी : महापालिका शिक्षण विभागाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने अनधिकृत शाळांची यादी जाहीर करूनदेखील सर्वच शाळा बिनदिक्कतपणे सुरू आहेत. अनधिकृत शाळेच्या दर्शनी भागावर 'अनधिकृत शाळा' असल्याबाबत फलक लावण्यात यावा, असे आदेश शिक्षण उपसंचालकांनी दिले आहेत. मात्र, या आदेशाला शिक्षण विभागाकडून वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.**




शहरात गेल्या १५ वर्षांपासून अनधिकृत शाळांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. कमी वेळेत मुबलक पैसा कमविण्याचे साधन बनवित समाजातील विविध क्षेत्रातील लोकांनी मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याचा धडाकाच लावला आहे. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसुलीही करतात. परंतु; आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत.

बहुसंख्य शाळा या शालेय शिक्षण विभागाची मान्यता न घेताच सर्रासपणे सुरू केल्या जातात. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात कारवाई न करण्यासाठी भरमसाट रक्कम दिली जाते. त्यात या विभागातील प्रत्येकाचा वाटा ठरलेला असतो.

#### नोटिशीला केराची टोपली

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ तसेच नियम २०२० अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेच्या दर्जात वाढ करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. परंतु, अनेक संस्थांनी शासनाची मान्यता न घेता अनधिकृतपणे शाळा सुरु केल्या आहेत.

यावर अनधिकृत शाळांना वारंवार नोटीस बजावली, तरी नोटिशीला केराची टोपली दाखवली जात आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने कोणत्याही भागात अनधिकृत शाळा सुरू असल्यास संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना व्यक्तिशः जबाबदार धरणार असून, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या शाळांना नोटीस बजावण्याबरोबरच शाळांच्या मुख्य दर्शनी भागावर 'अनधिकृत शाळा' असा फलक लावण्याचे आदेश दिले होते.

परंतु; प्रत्यक्षात शहरातील १३ पैकी एकाही शाळेच्या आवारात अनधिकृत शाळा असल्याचा फलक लावलेला नसल्याची वस्तुस्थिती 'सकाळ'च्या पाहणीत दिसून आली. याउलट या शाळांमध्ये जादा दराने शुल्क आकारणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणे, शाळांमध्ये गणवेश, शैक्षणिक साहित्य विकणे, शाळा चालविणाऱ्या संस्थाचालकांची मनमानी असे प्रकार घडत होते.

#### तपासण्यांचा अभाव

शिक्षणाधिकाऱ्यांकडून नियमितपणे तपासण्या होत नसल्यामुळेच या अनधिकृत शाळांचे पेव फुटले आहे. कोणाच्या वरदहस्ताने अनधिकृत शाळा सुरू राहतात? हा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. मात्र, अशा शाळांचा आकडा वाढतच चालल्याने विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान भरून न येणारे आहे. शिवाय, पालकांची होणारी आर्थिक लूट आणि फसवणूक हा कळीचा मुद्दा ठरत आहे.

#### कारवाईसाठी टाळाटाळ

वैध कागदपत्रे नसणाऱ्या शाळांवर कारवाई करून शाळा बंद करणे, एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे. अनधिकृत शाळा सुरू असताना अद्याप महापालिकेने शाळा बंद तर केल्या नाहीच, शिवाय गुन्हा दाखल करण्यास सुद्धा टाळाटाळ चालवली असल्याचे आरोप होत आहेत. अद्याप महापालिका शिक्षणाधिकाऱ्यांकडून कारवाईचा कोणताही अहवाल उपसंचालक कार्यालयाला मिळालेला नाही.

#### पत्र्याच्या शेडमध्ये शाळा

आरटीईच्या कायद्यानुसार भौतिक सुविधा नसलेल्या शाळांची मान्यता रद्द करता येते. आतापर्यंत अनेक शाळांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे. आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी त्यांची मान्यता काढणे गरजेचे होते. अनेक शाळा चाळीमध्ये पत्र्याच्या शेड, इमारतीमधील फ्लॅट आणि काही शाळा पार्किंगमध्ये भरविण्यात येतात. मुलांना खेळण्यासाठी मैदान नाही, स्वच्छतागृह नसल्याचे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

#### इतर शाळेत समायोजन शक्य

महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून अनधिकृत शाळांची यादी जाहीर केल्यावर पालक, विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरते. जर शाळा बंद झाली तर; मुलाचे शिक्षण कसे होणार? याची चिंता पालकांना सतावते; मात्र त्या शाळांतील सगळ्या विद्यार्थ्यांचे जवळील शाळेत समायोजन करण्यात येईल, असे महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

#### या आहेत 13 अनधिकृत शाळा...

महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शाळांचे सर्वेक्षण केल्यानंतर १३ अनधिकृत शाळा आढळून आल्या. यामध्ये माउंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल; कासारवाडी, पिपल ट्री एज्युकेशन ट्रस्ट; गांधीनगर-पिंपळे निलख, चैतन्य इंग्लिश मीडियम स्कूल; विशालनगर-पिंपळे निलख, आयडीएल इंग्लिश स्कूल; जवळकरनगर-पिंपळे गुरव, स्टारडम इंग्लिश मीडियम स्कूल; चऱ्होली, लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल; चिंचवडेनगर, नवजीत विद्यालय; लक्ष्मीनगर-वाल्हेकरवाडी, किड्सजी स्कूल; पिंपळे सौदागर, एम.एस. स्कूल फॉर किडस; सांगवी, क्रिस्टल मॉडर्न स्कूल; चिंचवड, डी. एम. के. इंग्लिश स्कूल; कासारवाडी, ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल; चिंचवड या शाळांचा समावेश आहे. या शाळेत पालकांनी आपल्या मुलांना प्रवेश घेऊ नये, असे आवाहन प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी केले होते.

---

# राजकारणाला बट्टा लावणाऱ्या नाना पटोलेंनी राजीनामा द्यावा!

### भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची मागणी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पराजयातही विजयाच्या उन्मादाने उन्मत्त झालेले कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी चक्क कार्यकर्त्याकरवी पाद्यपूजा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला काळीमा फासणारा असून याचे जाहीर प्रदर्शन करणाऱ्या नाना पटोलेंनी ताबडतोब पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून संन्यास घ्यावा, अशी मागणी भाजपाचे पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.**

देशाच्या राजकारणात कॉंग्रेसने व्यक्तिपूजेची परंपरा सुरू केली. गांधी घराण्याचे हुजरे यामध्ये आघाडीवर राहिले.

याच परंपरेचा शिरकाव कॉंग्रेसमध्ये तळागाळात पोहोचला असून कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांचे चिखलाने माखलेले पाय चक्क कार्यकर्त्यांनी पाण्याने धुतल्याचा प्रकार अकोला जिल्ह्यातील वाडेगाव येथे समोर आला आहे. अनेक निवडणुकांत सातत्याने होणाऱ्या पराभवानंतर काही जागांवर मिळालेल्या यशामुळे हुरळून गेलेल्या पटोले यांच्या अशा सरंजामशाहीला महाराष्ट्राच्या राजकारणात थारा दिला जाणार नाही, असेही शंकर जगताप यांनी या पत्रकात म्हटले आहे.

#### अन्यथा तीव्र आंदोलन उभारू



पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेस बट्टा लावणाऱ्या या कृतीबद्दल प्रायश्चित्त म्हणून पटोले यांनी राजकीय संन्यास घेऊन बुवाबाजी सुरू करावी व कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षपदावर पाणी सोडावे, अन्यथा त्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारू असा इशाराही शंकर जगताप यांनी या पत्रकाद्वारे दिला आहे.

# ऑर्किड शेतीचा यशस्वी प्रयोग..!



## भूमिका

**ऑया महागडय़ा समजल्या जाणाऱ्या फुलांची प्रामुख्याने थंड हवेच्या ठिकाणी लागवड केली जात असते; मात्र उष्ण आणि दमट अशा वातावरणात पॉलीहाऊसच्या माध्यमातून या फुलांची लागवड केली जाऊ शकते हे रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील निरुपमा मोहन यांनी सिद्ध करून दाखवले आहे. अनेक दिवस टिकणारे फूल अशी ऑर्किडची ओळख आहे.**

सतत ताजेतवाने दिसणारे हे फूल उत्सव काळात शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न देऊ शकते. प्रामुख्याने जून ते जानेवारी या कालावधीत या फुलांचा बहर सर्वाधिक असतो. उत्सव काळात या फुलांच्या एका काठीला चाळीस ते पन्नास रुपयांचा भाव मिळत असतो. त्यामुळे निरुपमा मोहन यांनी या फुलांची लागवड करण्याचा निर्णय घेतला. व्यवसायाने शिक्षका असलेल्या निरुपमा यांनी करोना काळात कर्जत येथे शेतीसाठी जमीन घेतली होती. त्या जमिनीत फुलांची किंवा भाजीपाला शेती करावी यासाठी त्यांनी तळेगाव येथील हॉर्टिकल्चर महाविद्यालयात प्रशिक्षण घेतले आणि कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली येथे जाऊन ऑर्किड शेतीचा अभ्यास केला. त्यातील बारकावे समजून घेतले. यानंतर आपल्या शेतजमिनीत ऑर्किड लागवडीचा निर्णय घेतला. कर्जत येथे कृषी अधिकारी सल्ल्याने त्यांनी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानामधून हरितगृह




बांधण्यासाठी अनुदान मिळावे असा अर्ज केला. शासनाच्या पोर्टलवर ऑनलाइन माहिती भरून प्रतीक्षा केली. यानंतर जानेवारी २०२३ मध्ये वेणगाव येथील जमिनीमध्ये २० गुंठे क्षेत्रात पॉलीहाऊस उभारून घेतले. मात्र, ऑर्किड फुलांची शेती करण्यासाठी अनेकांच्या सल्ल्यानंतर पुणे येथील राइज एन शाइन या कंपनीबरोबर करार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ऑर्किड फुलांचे कंद आणून त्यांची लागवड सुरू केली. चार महिन्यांनी म्हणजे जून महिन्यात ऑर्किडच्या तब्बल १९ हजार कंदांची लागवड नारळाच्या चौडामध्ये करण्यात आली. सुधारित प्रकारे मातीमध्ये लागवड न करता ते कंद जमिनीच्या वर तीन फूट वर जीआय पाइपच्या साहाय्याने उभारलेल्या बेडवर करण्यात आली. त्याच्या बाजूने खते आणि कीटकनाशक यांचा वापर करण्यासाठी ठिबक सिंचन वाहिन्या जोडणी केली. कंद लागवड झाल्यावर साधारण सात ते आठ महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात झाली. पॉलीहाऊसमधील तापमान नियंत्रित रहावे यासाठी व्यवस्था केली. हवा, पाणी आणि आद्रतेचे व्यवस्थापन केले. कीटकनाशके आणि खतांचा पुरवठा योग्य प्रकारे केला. त्यामुळे फुलांची शेती चांगलीच बहरली. मुंबईत या फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या पॉलीहाऊसमधील फुले प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅक करून मुंबईच्या बाजारात विक्रीसाठी पाठवण्यास सुरुवात केली.

त्याला चांगला दर आणि मागणी होऊ लागली. कर्जतसारख्या उष्ण हवामानाच्या प्रदेशात पॉलीहाऊसमध्ये ऑर्किड लागवडीचा पहिलाच प्रयोग करण्यात आला. तो यशस्वी ठरला आहे. ज्यातून त्यांना लाखमोलाचे उत्पादन मिळू लागले आहे. मुंबई आणि ठाणे या महानगरांमध्ये फुलांना मोठी मागणी असते. मात्र रायगड जिल्ह्यात फुलांचे शेतकरी फारसे उत्पादन घेत नाहीत. त्यामुळे फुलांसाठी पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रावर मुंबईला अवलंबून राहावे लागते. या वाहतुकीत फुलांचे नुकसान होण्याचे प्रमाणही अधिक असते. त्यामुळे रायगड जिल्ह्यात फुलशेतीला चांगली संधी असल्याचे निरुपमा सांगतात. या उपक्रमात कृषी विभागाचेही चांगले सहकार्य मिळत असल्याचे त्या सांगतात. कृषी विभागाचे उप विभागीय अधिकारी बालाजी ताटे, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी आणि अन्य कृषी पर्यवेक्षक, सहायक आठवडय़ातून दोनदा भेट देतात. चांगले मार्गदर्शन करतात. त्यामुळे कामाचा हुरूप वाढण्यास मदत होत असल्याचे त्या सांगतात. खुल्या बाजारात फुलांची विक्री करण्याबरोबरच फुलांची थेट विक्री करण्यावर निरुपमा यांनी भर दिला आहे. त्यांनी स्वत:चे संकेतस्थळ विकसित करून घेतले आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑर्किड फुलांचे वितरण सुरू केले आहे. रायगडातील तरुण आणि होतकरू तरुणांनी फुलशेतीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्या सांगतात.

## प्रासंगिक »

### निवडणुकीत महायुती

***गेली दहा वर्षे देशात सत्तेवर असलेल्या भाजपने यावेळीही लोकसभेत सर्वाधिक जागा जिंकून आपले नंबर १ चे स्थान कायम राखले. पण भाजपाच्या खासदारांच्या संख्येत व एनडीएच्या संख्याबळात महाराष्ट्राचा वाटा खूपच कमी आहे.***

उत्तर प्रदेश व महाराराष्ट्र ही देशातील क्रमांक १ व नंबर २ ची मोठी राज्ये. उत्तर प्रदेशातून २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपाने ८० पैकी ६२ जागा जिंकल्या होत्या, तर महाराष्ट्रातून भाजपा-शिवसेना युतीने ४८ पैकी ४१ जागांवर विजय मिळवला होता. यापेक्षा जास्त जागा या दोन राज्यांतून मिळाव्यात असे भाजपाला अपेक्षित होते. प्रत्यक्षात दोन्ही राज्यांनी भाजपाच्या महत्त्वाकांक्षेला दगा दिला. उत्तर प्रदेश व महाराष्ट्रात भाजपाची सत्ता आहे. केंद्रात भाजपाचे सरकार आहे, मग दोन्ही राज्यांत भाजपाचा दारूण पराभव का झाला? भाजपा व महायुतीच्या नेत्यांचे काय चुकले, काय कमी पडले, महायुतीला पराभव का पत्करावा लागला? याचे त्यांच्या नेत्यांनी तातडीने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान, तसेच कडधान्य व खाद्यतेल अभियान (गळितधान्य) योजनेतील विविध लाभांसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, गट यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

# दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने

बीज प्रक्रिया संच: राष्ट्रीय अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान कडधान्य योजनेत शेतकरी उत्पादक संघ, कंपनी यांना बीजप्रक्रिया प्रकल्पाचा लाभ घेता येतो. उत्पादित बियाण्यावर प्रक्रिया करून दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे उत्पादन करणारे शेतकरी उत्पादक संघ, कंपनी यांना बीज प्रकिया प्रकल्प उभारणी करण्यासाठी यंत्रसामुग्री, तसेच बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १० लक्ष रू. पर्यंत अनुदान मिळते. त्यासाठी शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनीला बँकेकडे कर्जासाठी प्रकल्प प्रस्ताव द्यावा लागतो. बँकेने कर्ज मंजूर केल्यावर ते अनुदानाचा लाभ मिळण्यासाठी पात्र होतात. गोदाम सुविधा: अन्नधान्य उत्पादनाच्या सुधारित साठवणुकीसाठी व मूल्यवृद्धीसाठी गोदाम सुविधा आवश्यक आहे. योजनेत २५० मे. टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा १२ लक्ष ५० हजार यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान मिळते. इच्छूक



अर्जदार शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनी यांनी केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना किंवा नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर अर्जदार पात्र ठरेल. बीज प्रक्रिया संच व गोदाम सुविधेसाठी जुलैच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावा. जिल्ह्यासाठी प्राप्त लक्ष्यांकापेक्षा अधिक शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनीचे अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीच्या मान्यतेने सोडत पद्धतीने लाभार्थ्यांची निवड होते. मनुष्यचलित बीजप्रक्रिया यंत्र: वैयक्तिक शेतकरी व शेतकरी गटामार्फत बीजप्रक्रिया यंत्र अनुदानावर देण्यात येते. या मनुष्यचलित ड्रम किंवा यंत्राच्या खरेदीसाठी किमतीच्या ५० टक्के किंवा प्रतियुनिट कमाल ८ हजार रू. अनुदान मिळते. यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकरी व शेतकरी गटांनी अर्ज करणे आवश्यक आहे. सिंचन साधने व सुविधा: सिंचन साधने व सुविधांसाठी एचडीपीई पाईप किमतीच्या ५० टक्के किंवा ५० रू. प्रति मीटर मर्यादित, तसेच पीव्हीसी पाईप किमतीच्या ५० टक्के ३५ रू. प्रतिमीटर मर्यादित, एचडीपीई लॅमिनेटेड वूव्हन ले फ्लॅट ट्युब किमतीच्या ५० टक्के २० रू. प्रति मी. मर्यादित, खरेदीसाठी एका शेतक-याला १५ हजार रू. मर्यादित अनुदान मिळते. त्याचप्रमाणे, अल्प व अत्यल्प भूधारक, अनुसूचित जाती, जमाती, महिला आदी लाभार्थ्यांना विजेचा पंप संच, डिझेल पंप यासाठी किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल १० हजार रू. प्रति पंप संच याप्रमाणे, तर सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्याला किमतीच्या ४० टक्के किंवा कमाल ८ हजार रू. प्रति पंप संच अनुदान मिळते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दोन्ही मेळाव्यांत आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी!

## खरी शिवसेना कोणाची, जनतेने निकाल दिला- मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त शिंदे गट आणि ठाकरे गट या दोन्ही बाजूंचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात ठाकरे गट आणि वरळीमध्ये शिंदे गटाचा देखील मेळावा झाला. त्यावेळी आमच्यात आत्मविश्वास आहे तर मोदींमध्ये अहंकार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले तर ठाकरे गट फक्त काँग्रेसच्या वोट बँकमुळे जिंकली, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.**



शिवसनेच्या 58 व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात शिवसेनेच्या नवनिर्वाचित खासदारांचं स्वागत करण्यात आलं तर लोकसभा निकालानंतर उद्धव ठाकरेंची तोफ चांगलीच कडाडल्याचं पहायला मिळालं. एनडीएच सरकार पडलं पाहिजे. आमच्यात आत्मविश्वास आहे. तर मोदींमध्ये अहंकार आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरेंनी यावेळी बोलताना नेहमीप्रमाणे शिंदे गटावर आणि भाजपवर तोफ डागली. परंतू यावेळी उद्धव ठाकरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर देखील निशाणा साधला. आपले कोण आणि परके कोण? हे लोकसभा निकालातून कळालं, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मनातील खंत देखील बोलून दाखवली. मला एका गोष्टीचा नक्कीच अभिमान आहे, की या निवडणुकीत फक्त शिवसेनाप्रमुखांचा फोटो वापरला. इतर कोणाचाही फोटो लावला नाही, याचा आम्हाला अभिमान आहे. या निवडणुकीत आपले कोण आणि परके कोण हे कळालं. काही जणांनी फक्त उद्धव ठाकरे नको म्हणून बिनशर्ट पाठिंबा दिला, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना जोरदार टोला लगावला. उघड पाठिंबा म्हणजे बिनशर्ट... असं म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंची खिल्ली उडवली. उद्धव ठाकरेंनी टीका केल्यानंतर सभेत टाळ्या आणि शिट्ट्या वाजल्या. शिवसेनाप्रमुखांनी दोन गोष्टी मला सांगितल्या, एक आहे आत्मविश्वास. माणसांमध्ये अहंकार असू नये. आत्मविश्वास असावा परंतु मोदींसारखा अहंकार असू नये, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली. भुजबळ शिवसेनेत जाणार, या नुसत्या उचापत्या भाजपवाले करत आहे. मी त्यांच्याशी बोललो नाही, की ते माझ्याशी बोलले नाहीत, असा खुलासा देखील उद्धव ठाकरेंनी यावेळी केला. दरम्यान, आपल्या भगव्या झेंड्यावर कुठलंच चिन्ह टाकू नका, आपल्या मशालीचा वेगळा प्रचार करा. छत्रपतींच्या भगव्यावर काहीच छापू नका, असा सल्ला उध्दव ठाकरेंनी दिला. मिंदे आणि भाजपला सांगतो तुम्ही जर षंड नसाल तर तुम्ही बाळासाहेब ठाकरेंचा फोटो न लावता धनुष्यबाणचिन्ह न घेता आणि शिवसेना नाव न लावता निवडणूक लढा. माझ्या वडिलांचा फोटो वापरता आणि मला स्ट्राइक रेट सांगतात. मिंदेच्या वडिलांचा फोटो लावा आणि निवडणूक लढवा. विधानसभासाठी मोदी तुम्ही सभा घ्या.. या मिंदेला बाजूला ठेवा, असे ठाकरे म्हणाले. मी आज पुन्हा एकदा शिवसेनेच्या वतीने सर्व देशभक्त ज्यामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, दलित या सर्वांना, मविआला मतदान करणाऱ्या सर्व देशभक्तांना मी धन्यवाद देतो. मी शून्य आहे, यशाचे धनी तुम्ही आहात. आत्मविश्वास असेल तर जगाच्या कोपऱ्यात कुठे जा तुम्हालाला कोणी रोखू शकत नाही. पण आत्मविश्वास आणि अहंकार यामध्ये फरक आहे. अहंकार जो मोदींमध्ये आहे. आता पुन्हा एकदा चर्चा करतात उद्धव ठाकरे मोदींसोबत जाणार. ज्यांनी शिवसेना फोडली, मातेसमान शिवसेनेला फोडलं त्या नालायकांसोबत परत जायचं? असे ठाकरे म्हणाले. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर आभार यात्रा काढणाऱ्या भाजप नेत्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. ४०० पार करणार होते ते २४० वर आले आणि आता आभार यात्रा काढत आहेत. मोदी हा ब्रँड होता आता ती ब्रँडी झाली आहे आणि आता या ब्रँडीचे दोन दोन घोट घेत त्यांना असली थेर सुचत आहेत, अशा शब्दात शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी जोरदार टोला लगावला. मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांना हिंदुत्वाची ॲलर्जी असल्याचा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला.

### ताकत मनगटात लागते

ठाणे, कोकण, संभाजीनगर हे शिवसेनेचे बालेकिल्ले अबाधित राहिलेत. कोणी म्हणत होतं ठाणे, कल्याणमध्ये शिवसेनेचा पराभव होईल, पण दोन लाखांपेक्षा जास्त मताधिक्क्याने विजय मिळवला. हा विजय घासून फुसून नाही तर ठासून विजय आहे. कोकात ठाकर सेनेला एकही जागा जिंकता आलेली नाही असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे. शिवसेनेच्या हक्काच्या मतदारांनी आपल्या शिवसेनेवर विश्वास ठेवला आहे. शिवसेनेवर भरभरून प्रेम करणाऱ्या मतदारांचं मनापासून आभार मानतो. काँग्रेसच्या दावणीला बांधलेली शिवसेना सोडवण्यासाठी दोन वर्षांपूर्वी उठाव केला तो खऱ्या अर्थाने या निवडणूकीत जनतेने शिक्कामोर्तब केलं. हा निर्णय कसा योग्य होता हे दाखवून दिलं आहे. वारसा सांगणाऱ्यांना आज हिंदू म्हणून घेण्याची लाज वाटू लागली आहे. त्यांना हिंदूत्वाची ॲलर्जी आली आहे. शिवतीर्थावर भाषण करताना देखील संपूर्ण इंडिया आघाडी होती. आज वर्धापण दिनीही तमाम हिंदू बांधव म्हणण्याची त्यांना हिंमत नव्हती. बाळासाहेबांचा फोटो लावून मतं मागण्याचा त्यांना अधिकार नाही, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता केला. म्हणून धनुष्यबाण पेलण्याची ताकत मनगटात लागते ती ताकद आपल्या धनुष्यबाणात आहे.

# अखेर हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्त होणार!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून यंत्रणांची झाडाझडती

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माहिती तंत्रज्ञान केंद्र अशी ओळख असणाऱ्या हिंजवडीतील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासह या परिसरात नवीन उद्योग येण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात.**

या परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यासारख्या पायाभूत सुविधा पूर्ण कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंजवडी औद्योगिक संघटनेच्या मागण्यांबाबत बुधवारी बैठक घेतली. ते म्हणाले की, हिंजवडी, माण, मारुंजी गावच्या हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून तीन टप्प्यांमध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान



उद्यान विकसित करण्यात आले आहे. येथील कंपन्यांना पूरक वातावरण देण्यास राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांनी उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे समन्वयाने आणि तातडीने निराकरण करावे. उद्योग, नोकरीनिमित्त हिंजवडीत येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत याठिकाणचे रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आपल्या हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनासाठी १० टन क्षमतेचा प्रकल्प उभारत आहे. मात्र, एमआयडीसी परिसरालगतच्या ग्रामपंचायत हद्दीतील घनकचऱ्यावर प्रक्रिया होणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १०० टन क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु करावी.

### कोंडी टाळण्यासाठी निर्देश

बैठकीस वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशीष शर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, आयुक्त व राहुल महिवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी अधिकारी उपस्थित होते.

# सरकारची शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा!

## 14 पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत केली मोठी वाढ

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची दुसरी बैठक पार पडली असून या बैठकीत शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत केंद्र सरकारने १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत (एमएसपी) मोठी वाढ केली आहे. मोदी सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.**



आज मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिलं असून आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत, असे ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याची माहिती दिली. मंत्रिमंडळाने खरीप हंगामातील १४ पिकांसाठी वाढीव किमान आधारभूत किंमत मंजूर केली आहे. त्यानुसार, कापसाला ७१२१ रुपये, भाताला २३०० रुपये किमान आधारभूत किंमत मंजूर करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याने सरकारच्या तिजोरीवर सुमारे २ लाख कोटी रुपयांचा भर पडले, अशी माहिती त्यांनी दिली.२०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या किंमतीच्या किमान दीडपट किमान आधारभूत किंमत दिली जाईल, असा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसारच मंत्रिमंडळाने किमान आधारभूत किंमतचे दर निश्चित केले आहेत, असेही ते म्हणाले. किमान आधारभूत किंमत ही केंद्र सरकारतर्फे वेळोवेळी निश्चित करण्यात येत असलेली पिकांची/धान्यांची अथवा कृषी उत्पादनांची किंमत असते. त्यानुसार सरकार शेतकऱ्यांकडून धान्यखरेदी करते. हा निर्णय भारत सरकारचे केंद्रीय मंत्रीमंडळ घेत असते. कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग अशा वाढीबाबत आपली शिफारस केंद्र सरकारला सादर करत असते. त्या शिफारसीनुसार केंद्रीय मंत्रीमंडळ आपला निर्णय जाहीर करते. या संबंधीची तरतूद त्या-त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात पूर्वीच करण्यात आलेली असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असणारा त्या धान्याचा भाव, मागील वर्षीचा खरेदी भाव, मागणी व पुरवठा, साधारणतः पेरणीचे क्षेत्र आदी अनेक गोष्टींवर ही किंमत ठरविली जाते.आज मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिलं असून आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत, असे ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याची माहिती दिली. मंत्रिमंडळाने खरीप हंगामातील १४ पिकांसाठी वाढीव किमान आधारभूत किंमत मंजूर केली आहे. त्यानुसार, कापसाला ७१२१ रुपये, भाताला २३०० रुपये किमान आधारभूत किंमत मंजूर करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या किंमतीच्या किमान दीडपट किमान आधारभूत किंमत दिली जाईल, असा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसारच मंत्रिमंडळाने किमान आधारभूत किंमतचे दर निश्चित केले आहेत, असेही ते म्हणाले.

### अश्विनी वैष्णव यांनी दिली माहिती

१४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याने सरकारच्या तिजोरीवर सुमारे २ लाख कोटी रुपयांचा भर पडले, अशी माहिती त्यांनी दिली.२०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या किंमतीच्या किमान दीडपट किमान आधारभूत किंमत दिली जाईल, असा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसारच मंत्रिमंडळाने किमान आधारभूत किंमतचे दर निश्चित केले आहेत, असेही ते म्हणाले. किमान आधारभूत किंमत ही केंद्र सरकारतर्फे वेळोवेळी निश्चित करण्यात येत असलेली पिकांची/धान्यांची अथवा कृषी उत्पादनांची किंमत असते. त्यानुसार सरकार शेतकऱ्यांकडून धान्यखरेदी करते. हा निर्णय भारत सरकारचे केंद्रीय मंत्रीमंडळ घेत असते. कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग अशा वाढीबाबत आपली शिफारस केंद्र सरकारला सादर करत असते. त्या शिफारसीनुसार केंद्रीय मंत्रीमंडळ आपला निर्णय जाहीर करते. या संबंधीची तरतूद त्या-त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात पूर्वीच करण्यात आलेली असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असणारा त्या धान्याचा भाव, मागील वर्षीचा खरेदी भाव, मागणी व पुरवठा, साधारणतः पेरणीचे क्षेत्र आदी अनेक गोष्टींवर ही किंमत ठरविली जाते.आज मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली.

# हिजाब बंदीचा आदेश एकसमान वस्त्रसंहितेसाठी

## चेंबूरस्थित महाविद्यालयाचा उच्च न्यायालयात दावा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाविद्यालयाच्या आवारात हिजाब, नकाब आणि बुरख्यावरील बंदी ही केवळ एकसमान वस्त्रसंहितेसाठी (ड्रेस कोड) असून त्यामागे मुस्लिम समुदायाला लक्ष्य करण्याचा कोणताही हेतू नाही, असा दावा चेंबूरस्थित ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या एन.जी आचार्य आणि डीके मराठे महाविद्यालयातर्फे बुधवारी उच्च न्यायालयात करण्यात आला.**



न्यायालयाने मात्र हिजाब, नकाब अथवा बुरखा परिधान करणे इस्लाम धर्माचा अविभाज्य भाग कसा ? असा प्रश्न याचिकाकर्त्यांना करताना या पेहरावावर अशा प्रकारे बंदी घालण्याचे अधिकार आहेत का ? अशी विचारणा महाविद्यालय व्यवस्थापनाला केली.न्यायमूर्ती एस. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांनी याचिकाकर्ते आणि महाविद्यालय व्यवस्थापनाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर हिजाब, नकाब आणि बुरख्यावर बंदीविरोधात दाखल याचिकेवरील निर्णय राखून ठेवला. या प्रकरणी २६ जून रोजी निकाल देण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. नकाब, बुरखा आणि हिजाब बंदीच्या महाविद्यालय व्यवस्थापनाच्या निर्णयाला नऊ विद्यार्थीनींनी आव्हान दिले आहे. तसेच, ही बंदी हटवण्याची मागणी केली आहे.या प्रकरणी बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी याचिकाकर्त्यांचा दाव्याला महाविद्यालय व्यवस्थापानातर्फे वरिष्ठ वकील अनिल अंतुरकर यांनी विरोध केला. महाविद्यालयात हिजाब, नकाब आणि बुरख्यावरील बंदीचा आदेश हा केवळ एकसमान वस्त्रसंहिता लागू करण्यासाठी असून तो मुस्लिमांविरोधी नाही. ही वस्त्रसंहिता सगळ्या धर्माच्या विद्यार्थ्यांकरिता आहे. आपण कोणत्या धर्माचे आहोत हे खुलेपणाने दाखवण्याची किंवा त्याचा उघड प्रचार करत फिरण्याची गरज विद्यार्थ्यांना नाही. विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षणात प्राविण्य मिळविण्यासाठी येतात. स्वतःच्या जाती, धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी नाही. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी फक्त शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे आणि महाविद्यालयात प्रवेश करताना सर्व बाहेर सोडून यावे, असा युक्तिवाद अंतुरकर यांनी केला. तसेच महाविद्यालय व्यवस्थापनाने महाविद्यालयात एक खोली उपलब्ध करून दिली असून विद्यार्थी वर्गात जाण्यापूर्वी त्यांचे हिजाब तेथे ठेवू शकतात.

### टिकली भारतीय असल्याची ओळख ?

आपल्या पसंतीचे कपडे परिधान करण्याचा प्रत्येकाला अधिकार असल्याच दावा याचिकाकर्त्यांच्यावतीने वकील अल्ताफ खान यांनी केला. तसेच, एका रात्रीत असा निर्णय का घेण्यात आला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. आतापर्यंत याचिकाकर्त्या आणि इतर विद्यार्थिनी हिजाब, नकाब आणि बुरखा परिधान करून वर्गात उपस्थित लावत होत्या. त्यावेळी, त्याला आक्षेप घेण्यात आला नाही. आता अचानक काय झाले ? आता ही बंदी का घातली गेली? वस्त्रसंहितेत सामाजिक सभ्यतेचा विचार करून कपडे परिधान करावेत, असे नमूद केले आहे.

# बॉयफ्रेंडबरोबर श्रद्धा कपूरने शेअर केला फोटो



बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर सध्या तिच्या 'स्त्री २' चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. अभिनेत्रीने २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आशिकी २' चित्रपटाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. तिच्या पहिल्या चित्रपटात श्रद्धाने अभिनेता आदित्य रॉय कपूरबरोबर स्क्रीन शेअर केली होती. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर श्रद्धाच्या वैयक्तिक आयुष्याबाबत चांगलीच चर्चा रंगली होती. श्रद्धा कपूर अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या जामनगर येथे पार पडलेल्या पहिल्या प्री-वेडिंग सोहळ्याला तिच्या कथित बॉयफ्रेंडबरोबर पोहोचली होती. एवढंच नव्हे तर श्रद्धा विमानतळावर आदित्य रॉय कपूर आणि राहुल मोदी यांची भेट घालून देतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याशिवाय एका फोटोमध्ये श्रद्धाने गळ्यात 'R' अक्षर असलेलं पेंडंट घातलं होतं. यावरून अभिनेत्री राहुल मोदीला डेट करत असल्याच्या चर्चा सर्वत्र चालू झाल्या. परंतु, श्रद्धाने याबाबत कुठेही भाष्य केलं नव्हतं किंवा राहुलबरोबर एकही फोटो शेअर केला नव्हता. अशातच इन्स्टाग्राम स्टोरीवर राहुल अन् तिचा एकत्र फोटो शेअर करत श्रद्धाने तिच्या तमाम चाहत्यांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला आहे.श्रद्धाने शेअर केलेल्या सेल्फी फोटोमध्ये हे दोघेही कॅमेराकडे बघून स्माइल देत असल्याचं पाहायला मिळत आहे. परंतु, अभिनेत्रीने या फोटोला काहीसं हटके कॅप्शन दिलं आहे. "दिल रख ले, नींद तो वापस दे दे यार" असं लिहित यापुढे श्रद्धाने हसण्याचे इमोजी जोडले आहेत. याशिवाय राहुलला तिने या पोस्टमध्ये टॅग सुद्धा केलं आहे. हा फोटो पाहिल्यावर श्रद्धाने प्रेमाची जाहीर कबुली देत त्यांच्या नात्यावर शिक्कामोर्तब केल्याच्या चर्चा आता सुरु झाल्या आहेत. श्रद्धाने हा सेल्फी फोटो शेअर करत याला "नींद चुराई मेरी किसने ओ सनम..." हे गाणं देखील लावलं आहे. राहुलच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर IMDB नुसार, राहुल मोदी 'प्यार का पंचनामा २', 'सोनू के टीटू की स्वीटी', 'तू झुठी में मक्कार' या चित्रपटांचा लेखक आहे. तसेच तो सहायक दिग्दर्शक म्हणून देखील काम करतो.दरम्यान, श्रद्धा कपूर आता लवकरच 'स्त्री २' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा बहुचर्चित चित्रपट येत्या १५ ऑगस्टला सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामध्ये श्रद्धा कपूरसह राजकुमार राव, अभिषेक बॅनर्जी, अपारशक्ती खुराना आणि पंकज त्रिपाठी यांच्या प्रमुख भूमिका असतील.

## शत्रूवरही अशी वेळ येऊ नये : सुप्रिया पाठारे

मराठी मालिका आणि चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री सुप्रिया पाठारे (SUPRIYA PATHARE) आणि तिचा मुलगा मिहीर पाठारे यांनी काही महिन्यांपूर्वी महाराज फास्ट फूड कॉर्नर या नावाच्या रेस्टॉरंट सुरु केलं. त्यांच्या या रेस्टॉरंटला खवय्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पण काही कारणांमुळे हे हॉटेल काही दिवसांसाठी बंद करण्यात आलं होतं. अशताच हॉटेल बंद असताना कोणकोणत्या संकटांना समोरं जावं लागलं? याबद्दल सुप्रियानं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. आता महाराजा हॉटेलला सुरुवात झाली आहे. पण दोन महिने हॉटेल बंद होतं. त्याचा बराच परिणाम झाला. कॅन्सरमुळे माझी आई गेली तसेच बरेच एकामोगून प्रसंग एक येत गेले. पहिल्यांदा हॉटेल जेव्हा बंद झालं तेव्हा स्टाफचं निघून गेला. मी नवीन हॉटेल सुरु करणाऱ्यांना

## जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष



प्रसिद्ध गायिका आशा भोसले (ASHA BHOSLE) यांनी अनेक हिट चित्रपटांमधील गाणी गायली आहेत. अशा भोसले यांना 'मेलोडी क्वीन' असंही म्हटलं जातं. आशा भोसले या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकतात. त्या अनेक कार्यक्रमांना देखील हजेरी लावतात. नुकत्याच आशा भोसले या त्यांच्या नातीसोबत एका कार्यक्रमामध्ये स्पॉट झाल्या. यावेळी अनेक पापाराझींनी त्यांचे फोटो काढले. आशा भोसले यांच्यासोबत त्यांची नात जनाई भोसले (ZANAI BHOSLE) हिचे देखील फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत. जनाईच्या सौंदर्याने अनेकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये जनाई ही मोकळे केस, साडी आणि मोत्यांचे गळ्यातले अशा लूकमध्ये दिसत आहे. तर आशा भोसले या ऑफ व्हाइट कलरची साडी आणि मोत्यांची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहेत. जनाई आणि आशा भोसले यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन जनाईच्या सौंदर्याचं कौतुक केलं आहे. जनाई ही आशा भोसले यांचा मुलगा आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई ही तिच्या आजीप्रमाणेच गायिका आहे. ती सोशल मीडियावर तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते.

## अबरार जिंदा है!

रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेला आणि संदीप रेड्डी वांगाचे दिग्दर्शन असलेला ॲनिमल हा गेल्या वर्षातील सर्वाधिक चर्चा झालेला एक लोकप्रिय चित्रपट होता. त्यानं बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केल्याचे दिसून आले. त्याचं जेवढं कौतुक झालं तेवढीच त्याच्यावर मोठ्या प्रमाणात टीकाही करण्यात आली होती. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना, बॉबी देओल, अनिल कपूर यांची देखील या चित्रपटामध्ये महत्वाची भूमिका होती. या सगळ्यात बॉबी देओलनं जी नकारात्मक व्यक्तिरेखा साकारली होती त्याचे कौतुक झाले होते. ती भूमिका पाहून नेटकऱ्यांनी, प्रेक्षकांनी बॉबीविषयी दिलेल्या प्रतिक्रिया देखील खूप काही सांगून जाणाऱ्या आहेत. लॉर्ड बॉबी हा सोशल मीडियावर खूपच लोकप्रिय असणारा सेलिब्रेटी आहे. ॲनिमलमध्ये रणबीर कपूर जेवढा लोकप्रिय झाला त्यापेक्षा बॉबीची क्रेझ जास्त असल्याचे दिसून आले. पहिल्या पार्ट मध्ये तो रणबीरच्या हातून मारला जातो. ते पाहिल्यानंतर बॉबीच्या चाहत्यांची निराशा झाली होती. मात्र आता ॲनिमलबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. ॲनिमलनंतर त्याच्या सिक्वेलची चर्चा होताना दिसत आहे. त्यामध्ये देखील बॉबी देओल दिसणार असल्याचे बोलले जात आहे. आणि पुन्हा त्यात बॉबी देओलही वेगळ्या भूमिकेत चमकणार आहे. अशी चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. यापूर्वी यावरुन वेगवेगळ्या चर्चांना उधाणी आले होते. २०२३ मध्ये वर्ल्ड वाईड ॲनिमलनं तब्बल ९०० कोटींचा बिझनेस केल्याचे दिसून आले.

## यश सोबत दिसणार बॉलीवूडची करिना?



सध्या साऊथ सिनेमांची चांगलीच हवा आहे. टॉलिवूड सिनेमे सुपर हिट होत असून आता हळू हळू बॉलिवूड स्टारही साऊथची वाट धरत आहेत. किंग खान म्हणजेच शाहरुख खानने देखील आता साऊथचा दिग्दर्शक ॲटलीसोबत जवानमध्ये काम केले. तर आता अभिनेत्री करिना कपुरही दक्षिणेकडे वळणार आहे. आता करीना कपूर खानही तिच्या साऊथ डेब्यूसाठी सज्ज झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहे. मिडिया रिपोर्टमध्ये असा दावा करण्यात येत आहे. तर आता करिना 'KGF' आणि 'KGF CHAPTER 2' सारखे सुपरहिट सिनेमे देणारा कन्नड सुपरस्टार यशसोबत काम करणार आहे. कन्नड सुपरस्टार यशसोबत करीना कपूर काम करणार असल्याच्या चर्चांमुळे दोघांचे चाहते उत्सुक आहेत. साऊथचा सुपरस्टार यश सध्या त्याच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. तो आता टॉक्सिक या चित्रपटात दिसणार आहे. आता यशाच्या 'टॉक्सिक'मध्ये करिना मुख्य भूमिकेसाठी दिसणार आहेत. तर निर्मातेही करिनासोबत काम करण्यास उत्सुक आहेत. इंडिया टुडेनुसार, यश आणि चित्रपटाचे निर्माते 'टॉक्सिक' साठी अशा अभिनेत्रीच्या शोधात होते जी केवळ प्रोजेक्टचा भाग होणार नाही तर प्रेक्षकांना आकर्षित करेल. त्यामुळे यासाठी करिना कपुरच्या नावाची चर्चा आहे. करिनाने 'टॉक्सिक' सिनेमास होकार दिल्यास हा तिचा पहिला साऊथ सिनेमा असेल. गीतू मोहनदास दिग्दर्शित हा चित्रपट 10 एप्रिल 2025 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# अमेरिका जिंकता जिंकता हरली!

## अमेरिकेने बरोबरीची टक्कर दिली; आफ्रिकेने विजय मिळवला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भेदक गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने अखेरीस अमेरिकेवर विजय मिळवलाच. विस्फोटक फलंदाजी, कमालीचं क्षेत्ररक्षण आणि चांगली गोलंदाजी या तिन्ही विभागातील शानदार कामगिरीसह अमेरिकेने आफ्रिकेला सहज विजय मिळवू दिला नाही. हरमीत सिंग आणि अँड्रयू गोसच्या भागीदारीने आफ्रिकेला घाम फोडला पण संघाने अखेरीस १८ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेने क्विंटन डीकॉकच्या ७४ धावा आणि मारक्रमच्या ४६ धावांसह ४ बाद १९४ धावांचा डोंगर उभारला. अमेरिकेने कडवी झुंज देत या लक्ष्याचा पाठलाग करताना ६ बाद १७६ धावा करू शकले.**






अँड्रियस गौसने विस्फोटक फलंदाजी करत संघासाठी ४७ चेंडूत ५षटकार आणि ५ चौकारांसह ८० धावांची खेळी केली, पण संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. कगिसो रबाडाच्या भेदक गोलंदाजीसमोर आणि हरमीत सिंगच्या विकेटनंतर सामना पलटला आणि अमेरिकेला पराभव पत्करावा लागला. धावांचा पाठलाग करताना अमेरिकेच्या सर्वच फलंदाजांनी पुन्हा एकदा मन जिंकणारी कामगिरी केली. दक्षिण आफ्रिकेच्या वतीने १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या अमेरिका संघाने उत्कृष्ट फलंदाजी केली. अमेरिकेच्या डावाच्या १८ व्या षटकापर्यंत, हा सामना जिंकून पुन्हा एकदा मोठा अपसेट काढू शकेल असे वाटत होते. पण १९ व्या षटकात आफ्रिकेने कमबॅक करत विजय मिळवला.९व्या षटकात कागिसो रबाडाने सामना फिरवला. या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर त्याने शानदार फलंदाजी करणाऱ्या हरमीत सिंगची विकेट घेतली. २१ चेंडूत ३८ धावांवर खेळत असलेल्या हरमीतने मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सीमारेषेवर झेलबाद झाला. हरमीतच्या विकेटनंतर अमेरिकेच्या संघाला मोठे फटके खेळण्याची संधी मिळाली नाही. या षटकात रबाडाने केवळ २ धावा दिल्या. त्यामुळे हा सामना दक्षिण आफ्रिकेच्या पूर्णपणे बाजूने फिरला.टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने सलग पाच सामने जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. गट टप्प्यातील सलग चार सामने जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने सुपर-८ मधील पहिला सामना जिंकून सलग पाचव्या विजयाची नोंद केली. क्विंटन डी कॉकला त्याच्या स्फोटक खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कार मिळाला. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिका संघाने ७१ धावांत चार विकेट गमावल्या. यामध्ये स्टीव्हन टेलर (२४), नितीश कुमार (८), कर्णधार आरोन जोन्स (०) आणि कोरी अँडरसन (१२) यांच्या विकेट्सचा समावेश आहे. कर्णधार ॲरोन जोन्स खातेही न उगडता बाद झाला, ज्याचा संघाला मोठ फटका बसला. कारण जोन्स यंदाच्या विश्वचषकात अमेरिकेसाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. मात्र, यानंतर अँड्रियस गौस (नाबाद ८०) आणि हरमीत सिंग (३८) यांनी सहाव्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी करत संघाला सामन्यात कायम ठेवले.अखेरच्या दोन षटकात अमेरिकेला विजयासाठी २८ धावांची गरज होती. पण १९व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर हरमीत झेलबाद झाला आणि त्यानंतर अमेरिकेचा संघ मागे पडला. त्यानंतर विजयासाठी शेवटच्या षटकात त्यांना २६ धावा करायच्या होत्या, मात्र संपूर्ण २० षटके खेळून संघाला ६ विकेट्सवर केवळ १७६ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून रबाडाने चार षटकांत १८ धावा देत तीन विकेट घेतले.

### मारक्रमने 46 धावा केल्या

सलामीवीर क्विंटन डी कॉकचे (७४ धावा) विस्फोटक अर्धशतक आणि कर्णधार एडन मारक्रमच्या दुसऱ्या विकेटसाठी ६० चेंडूत केलेल्या ११० धावांच्या भागीदारीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने मोठी धावसंख्या उभारली चार बाद १९४ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारत अमेरिकेला मोठे आव्हान दिले. डी कॉकने संथ आणि फिरकीपटूंसाठी योग्य समजल्या जाणाऱ्या खेळपट्टीवर अमेरिकन गोलंदाजांचा धुव्वा उडवला आणि ४० चेंडूंच्या डावात सात चौकार आणि पाच षटकार मारून स्पर्धेतील पहिले अर्धशतक झळकावले. सलामीवीर डिकॉकशिवाय मारक्रमने ४६ धावा केल्या तर हेनरिक क्लासेनने नाबाद ३६ आणि ट्रिस्टन स्टब्सने नाबाद २० धावा केल्या आणि पाचव्या विकेटसाठी ५३ धावांची नाबाद भागीदारी केली.

# भारतीय महिलांचा दक्षिण आफ्रिकेवर विजय

## स्मृती मानधना-हरमनप्रीतच्या शतकी खेळी ठरल्या भारी!

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**धावांची टांकसाळ ठरलेल्या मुकाबल्यात स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांच्या तडाखेबंद शतकी खेळीच्या बळावर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर ४ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. भारतीय संघाने दिलेलं डोंगराएवढया लक्ष्याला सामोरे जाताना दक्षिण आफ्रिकेच्या दोन शिलेदारांनीही शतकी खेळी साकारल्या पण भारतीय संघाने टिच्चून खेळ करत सामन्याचं पारडं फिरवलं.**




भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ३२५ धावांचा डोंगर उभारला. स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटसाठी केलेली १७१ धावांची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. स्मृतीने १८ चौकार आणि २ षटकारांसह १३६ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. हरमनप्रीतने ९ चौकार आणि ३षटकारांसह नाबाद १०३ धावांची दिमाखदार खेळी साकारली. ऋचा घोषने १३ चेंडूत २५ धावा चोपल्या आणि भारतीय संघाने सव्वातीनशेचा टप्पा ओलांडला.
या प्रचंड लक्ष्यासमोर खेळताना दक्षिण आफ्रिकेने विकेट्स गमवायला सुरुवात केली पण लॉरा वॉल्व्हडार्टने १२ चौकार आणि ३ षटकारांसह १३५ धावांची शानदार खेळी केली. क्रमांकावर खेळायला आलेल्या मारिझान कापने ९४ चेंडूत ११ चौकार आणि ३ षटकारांसह ११४ धावांची अविश्वसनीय खेळी साकारली. या दोघींनी स्मृती-हरमनप्रीतप्रमाणे चौथ्या विकेटसाठी १८४ धावांची खंडप्राय भागीदारी रचली. मारिझान बाद झाल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत पुनरागमन केलं. लॉराने एका बाजूने चिवटपणे लढा दिला. शेवटच्या षटकात आफ्रिकेला ६ चेंडूत ११ धावांची आवश्यकता होती पण पूजा वस्राकरने दोन विकेट्स पटकावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. दक्षिण आफ्रिकेला अवघ्या चार धावा कमी पडल्या. भारताकडून पूजा आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

### घोषने 13 चेंडूत 25 धावा चोपल्या

पहिल्या लढतीतही स्मृतीने दिमाखदार शतक झळकावलं होतं. भारतीय संघाने त्या लढतीत १४३ धावांनी विजय मिळवला होता. तिसरा सामना १९ तारखेला बंगळुरू इथेच होणार आहे.भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ३२५ धावांचा डोंगर उभारला. स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटसाठी केलेली १७१ धावांची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. स्मृतीने १८ चौकार आणि २ षटकारांसह १३६ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. हरमनप्रीतने ९ चौकार आणि ३षटकारांसह नाबाद १०३ धावांची दिमाखदार खेळी साकारली. ऋचा घोषने १३ चेंडूत २५ धावा चोपल्या आणि भारतीय संघाने सव्वातीनशेचा टप्पा ओलांडला. या प्रचंड लक्ष्यासमोर खेळताना दक्षिण आफ्रिकेने विकेट्स गमवायला सुरुवात केली.